SJIF 2014 = 3.189
ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# बी.एड अभ्यासक्रमातील पाठांबाबत – स्वयंमूल्यांकन व सहकाऱ्यांनी केलेल्या मूल्यांकनाचे स्थान

**कुऱ्हाडे शुभांगी सूर्यकांत** Ph.D

असि.प्राध्यापक, अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर,पुणे-९

**सारांश**

*बी.एड अभ्यासक्रमात विविध पाठांचा समावेश केलेला आहे.या पाठांचे मूल्यमापन करताना केवळ शिक्षक मूल्यमापन करून त्यावर अभिप्राय देत असतो.याबाबत संशोधकाला मूल्यमापनातील विविध मूल्यमापन पद्धतींचा विचार केला असता असे लक्षात आले की काही पाठांबाबत विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यांकन व सहकाऱ्यांनी केलेल्या मूल्यांकनाचा विचार करण्यासाठी पडताळा सूची,रूब्रिक व पदनिश्चयन श्रेणीचा वापर कसा करता येईल याचा विचार मांडला आहे.उच्च शिक्षणात स्वयंमूल्यांकन व सहकाऱ्यांनी केलेले मूल्यांकन एक व्यापक दृष्टीने केलेले मूल्यांकन आहे.*

***की वर्ड***– *स्वयंमूल्यांकन, सहकाऱ्यांनी केलेले मूल्यांकन*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना–**

मूल्यमापन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.शिक्षणपद्धतीत स्वयं व सहकाऱ्यांनी केलेल्या मूल्यांकनामुळे विविध बदल घडत आहे.स्वयंमूल्यांकनामुळे(**Self Assessment**) विद्यार्थी स्वत:च्या अध्ययन प्रक्रियेकडे अधिक लक्ष देतो. आपल्या अध्यापनातील चांगल्या बाबी व कमतरता याची त्याला जाणीव होते.उच्चस्तरीय कौशल्ये मिळविण्यसाठी तो प्रयत्न करतो.इतरांशी सहकार्याने वागण्याची प्रवृत्ती सहकाऱ्यांनी केलेल्या मूल्यांकनामुळे (**Peer Assessment** )वाढते.यामुळेच विद्यार्थ्यांची अध्ययन व अध्यापन प्रक्रिया अधिक विकसित करण्यासाठी स्वयं व सहकाऱ्यांनी केलेले मूल्यमापन अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्याभरणाच्या प्रक्रियेत तीन मार्गांनी प्रत्याभरण (Feed back) देता येते.शिक्षकाकडून विद्यार्थ्यांना,विद्यार्थ्यांकडून शिक्षकांना व विद्यार्थ्यांकडून विद्यार्थ्यांना. (१९९८) यांना विद्यार्थ्यांनी शिक्षकांना दिलेल्या

प्रत्याभरणामुळे अध्यापकांच्या अध्ययन प्रक्रियेत बरेचसे बदल झालेले दिसून आले. (२००३) स्वयं मूल्यांकन व सहकाऱ्यांनी केलेले मूल्यांकनात ११ अटींची क्षमता पूर्ण कराव्यात असे म्हटले आहे. (१९९१) स्वयंमूल्यांकनात विद्यार्थ्यांवा सहभाग,योग्य मानके ठरवून त्याप्रमाणे मूल्यांकन व आजीवन शिक्षण याबाबत सांगितले. विविध शिक्षणतज्ज्ञ हे शिक्षणाची मार्गदर्शक तत्त्वे व वर्गातील विद्यार्थ्यांच्याअ अध्ययनाच्या विविध संधी याबाबत विचार करीत आहेत,परंतु शिक्षणाची मार्गदर्शक तत्त्वे व प्रत्यक्ष अंमलबजावणी यात फारकत दिसते.म्हणूनच स्वयं मूल्यांकन व सहकाऱ्यांनी केलेले मूल्यांकन याबाबत आपण विचार करण्याची गरज आहे.(२००६) यांच्या मते मूल्यमापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे मूल्यमापन रचना,मूल्यमापनामधील विविध पर्याय,व मूल्यमापनाचे निकष ठरविणे अधिक सोपे जाते.

**स्वयं मूल्यांकन** (**Self Assessment**) –

**Boud(१९९५) यांच्या मते** – स्वयं मूल्यांकनात निश्चित मानके ठरवून त्याबाबत निर्णय घेणे व त्या मानंकाबरोबर आपल्या क्षमतेचे गुणवत्तापूर्वक मूल्यमापन करून दर्जा ठरविणे या दोन पैलूंचा समावेश होतो.

**Andrade & Du(२००७) यांच्या मते–** – स्वयं मूल्यांकनात विद्यार्थ्यांच्या (**Formative Assessment**) अकारिक मूल्यमापनाचा समावेश होतो.विद्यार्थी स्वत:च्या कामाची गुणवत्ता, अध्यायन,निर्णयप्रक्रिया व पदवी यांत समन्वय साध्याचा प्रयत्न करतो.याशिवाय स्वत:च्या कामातील कमतरता ओळखून त्यात बदल करतो.

➢ **स्वयं मूल्यांकन का करायचे?**

१) स्वत:च्या शिक्षणातील प्रगतीचा अंदाज घेण्यासाठी.

२) भविष्यकाळात काय शिकायचे? याचा निर्णय स्वत:च्या क्षमता ओळखल्यानंतर घेता येईल.

३) स्वयं मूल्यांकनात स्वयंअध्ययनाचे प्रतिबिंब दिसते.

४) स्वयं मूल्यांकनामुळे विद्यार्थ्याला स्वातंत्र्य व जबाबदारी याचे महत्त्व समजते.

५) अध्ययन प्रक्रियेवर आपली स्वत:ची मालकी आहे असे समजून विद्यार्थ्याचे अध्ययन घडते.

६) स्वयं मूल्यांकन असल्यामुळे ती बाहेरून लादलेली प्रक्रिया नाही.

७) स्वयं मूल्यांकनात अकारिक मूल्यमापनावर अधिक भर दिला जातो.

८) स्वयं मूल्यांकनात अध्ययनार्थ्याची विविधता,त्यांची कामाविषयक घ्यावयाची दक्षता,त्यांना येणारा अनुभव व पार्श्वभूमी यांचा विचार केला जातो.

९) स्वयं मूल्यांकनात विद्यार्थ्यांना अधिक जबाबदार बनविण्यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय व आजीवन शिक्षण ही अत्यंत महत्वाची कौशल्ये प्राप्त होणे आवश्यक आहे.

१०) स्वयं मूल्यांकन म्हणजे आम्हाला आधीच उत्तरे माहीत असलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहणे असा नाही तर अगदी एखाद्या क्षणी आलेल्या समस्या सोडविण्यासाठी केलेला प्रयत्न होय.

- **स्वयं मूल्यांकन प्रक्रिया कार्यन्वित कशी कराल?**

१) सर्वात प्रथम विद्यार्थ्यांना कोणताही विषय,कार्यक्रमासंबंधी स्वयं मूल्यांकन पद्धतीची ओळख करून देणे आवश्यक आहे.

२) या उपक्रमाचा नक्की हेतू कोणता आहे हे विद्यार्थ्यांना समजावून सांगावे.

३) विद्यार्थ्यांना त्यांच्याकडून काय अपेक्षित आहे हे समजावे यासाठी स्पष्ट सूचना असाव्यात.

४) स्वयं मूल्यांकनात विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या खऱ्या माहितीबाबत सुरक्षितता वाटेल याची खात्री देता आली पाहिजे.

५) कोणत्याही प्रक्रियेची मानके/निकष ठरविताना विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन त्याबाबत स्पष्टता असली पाहिजे.शक्य असल्यास त्या मानकांशी संबंधित नमुना विद्यार्थ्यांसमोर ठेवावा.

६) स्वयं मूल्यांकनाची जी चाचणी तयार केली जाईल त्यात अचुकता,सप्रमाणता,विश्वसनीयता या बाबींचा विचार केला आहे का? हे तपासावे.

७) स्वयं मूल्यांकनासाठी तयार केलेली चाचणी सहकाऱ्यांनी करावयाच्या मूल्यांकनासाठी वापरू शकतो.

८) सर्व उपक्रम, अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत नियमितपणे आपण याचा वापर करू शकतो.

९) ठरविलेल्या मानांकाचे निरीक्षण करून व्यावहारिक कौशल्ये प्राप्त करण्यासाठी विद्यार्थी प्रयत्न करू शकता

१०) स्वयं मूल्यांकनात विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व पुरेसा सराव या क्षमतांचा विकास करणे आवश्यक

आहे.स्वयं मूल्यांकनात संदर्भीय निकष तयार करून त्याप्रमाणे पडताळा सूची,रूब्रिक पदनिश्चयन श्रेणी यासारख्या तंत्राचा वापर करता येतो.विद्यार्थ्यांना त्यांची मूल्यांकन पत्र आधीच देऊन त्याचे निकष स्पष्ट केले जातात.त्याचप्रमाणे आपण स्वत: मूल्यांकन का करायचे? याबाबत ही स्पष्ट कल्पना दिली जाते. विद्यार्थी स्वत:चे काम पूर्ण झाल्यानंतर गुण अथवा श्रेणी देऊ शकतात. स्वयं मूल्यांकनामुळे विद्यार्थ्यांचे अध्ययन योग्य दिशेने होते की नाही म्हणजेच दिलेल्या निकषांप्रमाणे आपण काम करीत आहोत की नाही हे समजते,परंतु त्यासाठी त्यांना प्रेरणा देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

- **सहकाऱ्यांनी केलेले मूल्यांकन** (Peer Assessment) –

सहकाऱ्यांकडून केलेल्या मूल्यमापनाची अनेक रूपे आहेत.परंतु याठिकाणी एका विद्यार्थ्यानी दुसऱ्या विदार्थ्याचे केलेले मूल्यांकन होय.त्याने त्या विद्यार्थ्याने केलेल्या कामाबाबत दर्जा ठरवून दिलेला अभिप्राय होय.याठिकाणी एक विद्यार्थी दुसऱ्या विद्यार्थ्याचे मूल्यांकन श्रेणी देऊन करू शकतो अथवा प्रत्याभरण द्यावे असे अपेक्षित असते.

Falchikov,( 2007) - "Peer assessment requires students to provide either feedback or grades (or both) to their peers on a product or a performance, based on the criteria of excellence for that product or event which students

may have been involved in determining"

Boud,Cohen & Sampson(1999) Observe that " If students are expected to put more effort into a course through their engagement in peer learning activities, then it may be necessary to have this effort recognized through a commensurate shift in assessment focus."

**Peer Assessment चा वापर का करायचा?**

१) आपल्या जीवनातील विकासप्रक्रियेचा **Peer Assessment** एक महत्त्वाचा भाग आहे.

२) औपचारिक शिक्षणात शिक्षकांच्या भूमिकेबरोबरच आपल्या सहकाऱ्याची भूमिका ही तितकीच महत्त्वाची आहे.

३) सहकाऱ्यांनी दिलेल्या प्रत्याभरणामुळे सहकार्यात्मक अध्ययनही चांगले घडू शकते.

४) सहकाऱ्यांमधील अध्ययनाबाबत **Kvale(2006)** याने **"Cognitive apprenticeship model"** तयार केले.त्यांच्या मते- विद्यार्थी एकमेकांतील कमतरता जाणून घेऊन शिक्षणप्रक्रिया अधिक सुलभरित्या आकलन होण्यास मदत करतात.

- एका संशोधनात असेही दिसून आले आहे की लेखन कौशल्याचा विकास करण्यासाठी सहकार्यात्मक अध्ययनाचा (Peer Learning) अधिक चांगला वापर झाला आहे.

५) विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या प्रत्याभरणात त्यांच्या कामाबाबतच्या विविध कल्पना,वेगळ्या पद्धतीने केलेला विचार,सुधारणा व प्रोत्साहन मिळू शकते.

६) **Peer Assessment** मध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील असमतोल दूर होण्यास मदत होते तसेच अध्ययन प्रक्रियेतील विद्यार्थ्यांचे स्थान अधिक प्रभावशाली होते.

७) **Peer Assessment** हे अध्ययन प्रक्रिया कशी घडते,विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व त्यांच्या कल्पनांना अधिकाधिक वाव देण्यासाठी आहे.

८) यात तात्काळ प्रत्याभरण दिले जाते त्यामुळे अकारिक मूल्यमापन (Formative) चांगल्या प्रकारे होऊ शकते.यात विद्यार्थ्याने दुसऱ्या विद्यार्थ्याला त्याच्या कामाबाबत श्रेणी अथवा अभिप्राय देणे महत्त्वाचे असते.

**Peer Assessment** शिक्षण प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग बनला आहे. आपल्या बी.एड अभ्यासक्रमात आपण याचा वापर सूक्ष्म अध्यापनापासून करीत असतो.सूक्ष्माध्यापनाचे काम गटात चालू असताना जो विद्यार्थी पुढे जाऊन अध्यापन करतो त्याला त्याचे गटप्रमुख प्राध्यापक त्याचप्रमाणे त्याच्या गटातील इतर सहअध्ययनार्थी सुद्धा तोंडी प्रत्याभरण देत असतात.त्यामुळे त्याला आपल्या पाठातील चांगल्या बाबी व उणिवा लगेच समजतात.तसेच चांगल्या कामाबद्दल आपल्या सहकाऱ्यांकडून प्रोत्साहनही मिळते.परिणामी अध्ययन- अध्यापन प्रक्रिया चांगली घडते.

**Peer Assessment** कार्यन्वित कसे कराल?

१)विद्यार्थ्यांना सराव दिल्यास विद्यार्थी सहकारी विद्यार्थ्याचे चांगले मूल्यांकन करू शकतात.

२)पाठांबाबतच्या निरीक्षणाखेरीज वर्गात देखील **Peer Assessment** चा वापर करू शकतो. उदा. गटचर्चा,विशिष्ट विषयावर तयार केलेल्या नोट्स,सेमीनार इ.

३)यात मूल्यांकनाचे निकष अगदी स्पष्ट असले पाहिजेत.

४)प्रत्याभरण देताना सर्व विद्यार्थ्यांना सहभाग मिळेल याची खात्री करून घ्या व तोंडी स्पष्टीकरण,विश्लेषण व सूचना हे सर्व घटक प्रत्याभरणासाठी आवश्यक आहेत.ते जर प्रत्यक्ष ज्याव्यक्तीचे मूल्यांकन केले आहे त्याच्यासमोर लगेच (Face to face) केले गेले तर अधिक चांगले होईल.

५)शैक्षणिक वातावरण अधिक चांगले होण्यासाठी **Peer Assessment व Peer Learning** यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न करा.

**6)Peer Assessment** व **Teacher Assessment** या दरम्यान पुरेसा वेळ असणे आवश्यक आहे.म्हणजे **Peer Assessment** झाल्यानंतर विद्यार्थ्याला त्याच्या चुका समजतील व नंतर शिक्षकाने मूल्यांकन करावे.

७)प्रत्यक्ष पाठ संपल्यावर लगेचच वर्गात **Peer Assessment** होणे आवश्यक आहे.एकदा विद्यार्थी वर्गाचा बाहेर पडले व नंतर काही वेळाने हे प्रत्याभरण घेतले तर ते विश्वसनीय असणार नाही.

८)विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक चांगले होण्यासाठी सहकाऱ्यांनी प्रत्याभरण देणे आवश्यक आहे याची जाणीव करून देणे आवश्यक आहे.एखादे व्याख्यान संपल्यावर विद्यार्थ्यांनी एकमेक़ांच्या वह्या तपासाव्यात.त्यामध्ये सदर व्याख्यानाबाबत आपल्याला जे आकलन झाले आहे त्या संदर्भातील अभिप्राय लिहावेत,यामुळे व्याख्यानातील आशयासंबंधी काही शंका असल्यास त्या दूर होतील.त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्यात्मक अध्ययनाचे वातावरन निर्माण होईल.हा अभिप्राय सहकारी अध्ययनार्थी लेखी,तोंडी अथवा चर्चा करूनदेखील देऊ शकतात.यात सर्वात महत्त्वाचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे महत्त्वाचे आहे. **Peer Assessment** कसे करावे याबाबत स्पष्ट सूचना द्याव्यात.कोणत्याही विद्यार्थ्यांबाबत पूर्वग्रह लक्षात न घेता हे मूल्यांकन व्हावे.यादृष्टीने बी.एड अभ्यासक्रमातदेखील आपल्याला **Self Assessment व Peer Assessment** चा वापर करता येईल.स्वयंमूल्यांकन पाठ सुरू होण्यापूर्वी व **Peer Assessment** पाठ सुरू असताना व स्वयंमूल्यांकन पुन्हा पाठ संपल्यावर कसे करता येईल याबाबत संशोधकाने पडताळा सूची,रूब्रिक व पदनिश्चययन श्रेणीचा वापर कसा करता येईल हे सांगितले आहे.

**विद्यार्थ्यांने पाठ घेण्यापूर्वी केलेले स्वयंमूल्याकन**

| प्रश्नार्थक विधाने | होय | नाही |
|---|---|---|
| १)पाठटाचण योग्य पायऱ्यानुसार,व्याकरणदृष्ट्या योग्य तयार केले का? | | |
| २)वेळेच्या उपलब्धतेनुसार पाठाचा आशय निवडला का? | | |
| ३) पाठातील अध्यापन मुद्दे तयर केले का? | | |
| ४)पाठाची उद्दिष्टे निश्चित केली का? | | |
| ५)पाठातील प्रश्नांची रचना योग्य केली आहे का? | | |
| ६)पाठातील आशयाचे अध्यापन करण्यासाठी योग्य संदर्भग्रंथांचा वापर केला का? | | |
| ७)पाठासाठी अनुरूप शैक्षणिक साहित्याचा वापर केला का? | | |
| ८)पाठात योग्य त्या ठिकाणी गाभाघटक,मूल्ये व जीवनकौशल्ये यांचा परिचय करून देण्यासाठी योग्य अध्ययन अनुभवांची निवड केली का? | | |
| ९)निवडलेल्या अध्यापन पद्धतीनुसार पाठटाचण आहे का? | | |
| १०)पाठासंबंधी पूर्वज्ञान जागृत करण्यासाठी नाविन्यपूर्वक विचार केला आहे का? | | |
| ११)संकलनातील प्रश्नांमध्ये वस्तूनिष्ठ/लघुत्तरी/दीर्घोत्तरी/मुक्त/उच्चस्तरीय प्रश्नांचा समावेश केला आहे का? | | |
| १२) पाठमार्गदर्शन घेण्यापूर्वी आपणाला अध्यापन करतान येणाऱ्या अडचणींची यादी तयार केली का? | | |
| १३) उपयोजन पातळीवरील प्रश्नांची काठिण्यपातळी तपासली का? | | |
| १४) फलकलेखनाचे योग्य नियोजन केले का? | | |
| १५) स्वाध्याय विद्यार्थ्यांच्या कृतीला वाव देणारा आहे का? | | |

**पाठ सुरु असताना सहकारी अध्यापकाने करावयाचे मूल्यांकन**

| आशय | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| **पाठटाचण व मार्गदर्शन** | पाठटाचण वेळेच्या अगोदर पूर्ण नव्हते. | ज्या दिवशी पाठ आहे त्या दिवशी पाठटाचण तयार केले.मार्गदर्शन घेतले नाही. | पाठटाचण वेळेपूर्वी तयार केले.मार्गदर्शन घेतले. | पाठटाचण वेळेपूर्वी तयार करून,पाठासंबंशी असणाऱ्या अडचणींची यादी करून पाठमार्गदर्शन घेतले. |
| **प्रस्तावना** | पूर्वज्ञानावर आधारित प्रश्न विचारले | चित्रे,नकाशा/ आलेख यांचा वापर करून प्रश्न विचारले. | चित्रे,नकाशा/आलेख यांचा वापर करून व विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग घेऊन प्रश्न विचारले | पूर्वज्ञानावर आधारित वर्तमानपत्र/व्हिडीओ क्लिप/टेपरेकॉर्डर/चर्चा/ शाब्दीक खेळांचा वापर करून प्रस्तावना केली. |
| **हेतुकथन** | पूर्वज्ञान पाठ्यघटक यांच्याशी सांगड घालता आली | पूर्वज्ञान व पाठ्यघटक यांच्यात थोड्या प्रमाणात सांगड | पूर्वज्ञान व पाठ्यघटक यांच्यात योग्य सांगड घातली. | पूर्वज्ञान व पाठ्यघटक यांच्यातील दुवा अत्यंत प्रभावीपणे साधून हेतुकथन सुस्पष्टपणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नाही. | घालता आली. | | केले. |
| **विषय विवेचन** | स्पष्टीकरण योग्य उदा.सह केले. | आवाजातील चढ उतार,प्रश्नांची योग्य रचना यानुसार योग्य उदा.सह स्पष्टीकरण केले. | आवाजातील चढ उतार,प्रश्नांची योग्य रचना यानुसार योग्य उदा.सह स्पष्टीकरण केले. केवळ एका साधनाचा वापर | आशयानुकूल आवाज,उदा.सह स्पष्टीकरण, व्याकरणदृष्ट्या व विचारप्रर्वतक प्रश्नांची योग्य रचना,शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर |
| **फलकलेखन** | ठीक केले | रंगीत खडूचा अतिवापर,फळ्या चे योग्य नियोजन | रंगीत खडूचा योग्य वापर,फलकलेखन सरळरेषेत व मुद्देसुद | रंगीत खडूचा योग्य वापर फलकलेखन सरळ रेषेत व मुद्देसुद,फळ्याचे योग्य नियोजन |
| **प्रश्न व प्रबलन** | प्रश्न कमी विचारले. विद्यार्थ्यांचा सहभाग कमी | प्रश्न योग्य प्रमाणात विचारले.परंतु मुक्त व उच्चस्तरीय प्रश्नांची संख्या अधिक हवी होती.प्रबलन दिले. | प्रश्न योग्य प्रमाणात विचारले. मुक्त व उच्चस्तरीय प्रश्नांची संख्या योग्य होती.प्रबलन दिले. | प्रश्नांची योग्य रचना व प्रमाणात विचारले. उच्चस्तरीय व मुक्त प्रश्नांची संख्या अधिक होती,वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला. |
| **विषयावरील प्रभूत्त्व** | विषय अधिक सोप्या पद्धतीने समजावून सांगायला हवा होता. | आशय स्पष्ट करताना अजून सोपी उदा.देणे आवश्यक होते. | आशय विविध उदा.द्वारे स्पष्ट केला. | आशयानुसार एका विषयाचा इतर विषयांशी समवाय,वयानुरूप विविध उदा.चा वापर, विविध पुस्तकांचे वाचन, |

**पाठ झाल्यानंतर विद्यार्थ्याने करावयाचे स्वयं मूल्यांकन– पदनिश्चयन श्रेणी**

| तपशील | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| १)पाठाची प्रस्तावना | | | | | |
| २) हेतुकथन | | | | | |
| ३)कथनातील ओघवतेपणा | | | | | |
| ४) योग्य उदा.सह स्पष्टीकरण | | | | | |
| ५) प्रश्नांची योग्य रचना | | | | | |
| ६) फलक लेखन,स्वाध्याय | | | | | |
| ७)पाठाचे Peer Assessment झाल्यानंतर त्यांनी सूचविलेल्या सुधारणा | | | | | |
| ८) शिक्षकांनी दिलेले गुण | | | | | |

९)विद्यार्थ्यांचा सहभाग

10)Peer Assessment व Teacher Assessment

यांच्या गुणातील मूल्यता

अशा प्रकारे पाठ सुरू होण्यापूर्वी,पाठ सुरू असताना व पाठ झाल्यानंतर आपल्याला स्वयं मूल्यांकन व सहकाऱ्यांनी केलेले मूल्यांकन याचा वापर करता येईल.

**संदर्भसूची**

Andrade, H. & Du, Y. (2007). Student responses to criteria-referenced self-Assessment. *Assessment and Evaluation in Higher Education*, 32 (2), 159-181

Boud, D. (1995). *Enhancing learning through self-assessment*. London: Kogan Page

Boud, D. & Falchikov, N. (2006) Aligning assessment with long-term learning. *Assessment and Evaluation in Higher Education*, 31(4), 399-413.

Boud, D. & Falchikov, N. (2007). *Rethinking assessment in higher education*. London: Kogan Page.